**राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना २०२६-२७ च्या भाग I अंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त बिनव्याजी कर्ज निधी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२६/प्रक्र २२/अर्थबळ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ४ ऑगस्ट २०२६

वाचा- १) वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.४४(१)/PF-S/२०२६-२७ (CAPEX), दि.२७.०३.२०२६

२) वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मंजूरी पत्र क्र. F.No.४४(१)/PF-S/२०२६-२७ (CAPEX)-Maharashtra (E File No-३००७८५२४४) दि.२९/०७/२०२५

३) वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मंजूरी पत्र क्र. F.No.४४(१)/PF-S/२०२६-२७ (CAPEX)-Maharashtra, (E File No-३००७८५२४४),दि.२९.०७.२०२६

४) वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.४४(१)/PF-S/२०२६-२७ (CAPEX)-Maharashtra-SACE-३९ दि.२९.०७.२०२६

५) वित्त मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.४४(१)/PF-S/२०२६-२७ (CAPEX)-Maharashtra-SACE- दि.२९.०७.२०२६

६) वित्त विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२६/प्र.क्र.३८/अर्थबळ, दि.९.७.२०२६.

७) वित्त विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२६/प्र.क्र.४६/अर्थबळ, दि.९.७.२०२६.

८) वित्त विभाग, शासन निर्णय, समक्रमांक दि.३.८.२०२६.

**प्रस्तावना:**

वाचा क्र.८ येथील शासन निर्णय रद्द करुन, खालीलप्रमाणे सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली गुंतवणूकीसाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून राज्यांना ५० वर्षे मुदतीचे बिनव्याजी कर्ज देण्यात येते. राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना-२०२६-२७ अंतर्गत केंद्र शासनाने दिनांक २९/०७/२०२६ च्या आदेशान्वये भाग I च्या प्रस्तावांना मंजूरी देऊन, दिनांक २९/०७/२०२६ च्या आदेशान्वये यापैकी ६६ टक्के रकमेचा पहिला हप्ता वितरीत केला आहे.

२. आता केंद्र शासनाने भाग **I मध्ये** वितरित केलेल्या रक्कमेचे प्रशासकीय विभागांना वाटप करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

केंद्र शासनाच्या राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना २०२६-२७ मध्ये भाग - I मधील रक्कमेचे संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना खालीलप्रमाणे वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे-

भाग  I  - **Untide**

| अ. क्र. | विभाग | केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रस्तावाची रक्कम (रु.कोटी) | पहिल्या हप्त्याचा अपेक्षित निधी (रु.कोटी) | SNA खात्यात वर्ग करावयाची रक्कम रुपये | ज्या लेखाशीर्षातंर्गत मंजूर तरतूदीतुन खर्च करावयाचे तपशिलवार लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १ | सार्वजनिक बांधकाम विभाग | १४११.६६ | ९३१.६९५६ | रु.९३१,६९,५६,०००/- (अक्षरी रुपये नऊशे एकतीस कोटी एकोणसत्तर लक्ष छप्पन हजार फक्त) | मागणी क्रमांक जी-८, ५०५४, मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च, ०३, राज्य महामार्ग, ३३७, रस्त्यांची बांधकामे,(०१) केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेअंतर्गत ५० वर्षांसाठी बिनव्याजी कर्ज,(०१) (०१) सास्की योजनेअंतर्गत रस्ते व पूल प्रकल्पासाठी बिनव्याजी कर्ज (कार्यक्रम),५३, मोठी बांधकामे, संगणक सांकेतांक क्रमांक **५०५४ ५५९२** |
| | **एकूण** | **१४११.६६** | **९३१.६९५६** | | |

३.	केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना २०२६-२७ भाग **I** अंतर्गत सास्की योजनेअंतर्गत रस्ते व पूल प्रकल्पासाठी (सोबत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रकल्पांची यादी जोडली आहे) केंद्र शासनाने वितरीत केलेल्या पहिल्या हप्त्यापोटी सार्वजनिक बांधकाम विभागासाठी रु.९३१,६९,५६,०००/-(अक्षरी रुपये नऊशे एकतीस कोटी एकोणसत्तर लक्ष छप्पन हजार फक्त) SNA बँक खात्यात वर्ग करण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.  उपरोक्त रक्कम वरील तक्यामध्ये रकाना क्रमांक ६ येथील लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या वर्षासाठी मंजूर तरतुदीमधून खर्ची घालण्यात याव्यात.

४.	विभागांनी केंद्र शासनाने  संबंधित प्रकल्पासाठी कर्ज मंजूर केले आहे, त्याच प्रकल्पांवर मंजूर मर्यादेमध्ये खर्च करावे.  काही अपरिहार्य परिस्थितीत यामध्ये बदल करावयाचे असल्यास, त्यासाठी केंद्र शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे विभागांनी सुस्पष्ट कारणांसह वित्त विभागास बदलाचा प्रस्ताव सादर करावा.

५.	उपरोक्त निधी अधिदान व लेखा कार्यालयातून आहरित करण्यासाठी संदर्भ क्रमांक ६ येथील शासन निर्णयान्वये सहाय्यक संचालक, ऋण व हमी सनियंत्रण कक्ष, वित्त विभाग यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच सह सचिव, अर्थबळ, वित्त विभाग यांना नियंत्रक अधिकारी म्हणून  घोषित करण्यात आले आहे.

६.	आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्यास मंजूरी प्राप्त रक्कम **रु.९३१.६९५६ कोटी (भाग I)** अधिदान व लेखा अधिकारी , मुंबई यांच्याकडून आहरित करुन दिनांक १४ मे २०२६ च्या  शासन निर्णयाद्वारे बँक ऑफ महाराष्ट्र येथे उघडण्यात आलेल्या जोडपत्र-अ मध्ये नमूद केलेल्या SNA खात्यामध्ये वर्ग करण्यात यावी.  याबाबतच्या खर्चमेळाची कार्यवाही ऋण व हमी सनियंत्रण कक्षाने करावी.

७.	केंद्र शासनाच्या दिनांक २७.०३.२०२६ च्या पत्रातील मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक ७ येथील शासन निर्णयान्वये  केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणूकीसाठी विशेष सहाय्य योजनेंतर्गत प्राप्त होणा-या बिनव्याजी कर्जाचे राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक

सुचनांनुसार अनुसरावयाची कार्यपध्दती विशद करण्यात आली आहे. त्या सूचनांनुसार विभागाने काटेकोरपणे कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

८. सदरहू SNA बँक खात्यात जमा होणारा निधी हा PFMS प्रणालीद्वारे संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी त्यांच्या स्तरावर निवडलेल्या लाभार्थ्यांना केंद्रीय पद्धतीने वितरित करण्यात यावा. यासंदर्भात वित्त विभागाच्या दिनांक १४.५.२०२६ आणि दिनांक ९.७.२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनानुसार सदर मंजूर रक्कम PFMS प्रणाली द्वारे वितरित करण्याची योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

९. केंद्र शासनाकडून दुसऱ्या हप्त्याचा निधी प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधित विभागांनी वरील तक्त्यामधील रकाना क्रमांक ५ मधील रकमेच्या किमान ७५ टक्के इतक्या रकमेच्या खर्चाचे प्रमाणपत्र केंद्र शासनाच्या GFR १२B या नमुन्यात संबंधित विभागाच्या अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव यांच्या स्वाक्षरीने दिनांक ०५ सप्टेंबर २०२६ पूर्वी वित्त विभागास सादर करावे. मात्र उर्वरित सर्व निधी दिनांक ३१ मार्च २०२७ पर्यंत पूर्णपणे खर्च करणे बंधनकारक राहील याची विभागानी नोंद घ्यावी.

१०. केंद्र शासनाकडून प्राप्त निधी कोषागारातून काढून संबंधित अंतिम लाभार्थ्यांना प्रदान केल्यानंतरच तो खर्च म्हणून गृहीत धरण्यात येईल. कोषागारातून काढलेला निधी अन्य खात्यात साठवून ठेवण्याची परवानगी नाही, ही बाब लक्षात घ्यावी.

११. केंद्र शासनाकडून प्राप्त निधी खर्च करताना संबंधित प्रकल्पांवर त्याच बाबीसाठी केंद्र किंवा राज्य शासनाच्या अन्य निधीमधून किंवा राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना २०२६-२७ मध्ये अन्य भागात प्राप्त झालेल्या निधीमधून दुबार निधी प्रदान केला जाणार नाही याची सर्व विभागांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. विभागाच्या सचिवांच्या स्वाक्षरीने तसे प्रमाणपत्र यापूर्वीच केंद्र शासनास सादर करण्यात आले आहे हे लक्षात घेण्यात यावे.

१२. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या सर्व प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल विभागाच्या अभिलेखात एकत्रितरित्या उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यासाठी विभागाने एक नोडल अधिकारी नेमून सर्व अभिलेख तसेच देयके उपलब्ध राहतील याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात केंद्र शासनाकडून महालेखापालांमार्फत केव्हाही लेखा परीक्षण होण्याची शक्यता आहे. त्यांना सर्व अभिलेख उपलब्ध करुन देण्याची संबंधित विभागाची जबाबदारी राहील.

१३. सदरचा शासन निर्णय, वित्त विभाग/व्यय ७ कार्यासनाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४९९, दि.३.८.२०२६ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०८०४१८४०२१४७०५ असा आहे.हा आदेश डिजीटल सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सहपत्र : केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रकल्पांची यादी.

VIJAY DATTATRAYA SHINDE

Digitally signed by VIJAY DATTATRAYA SHINDE
DN: CN = VIJAY DATTATRAYA SHINDE, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Finance Department
Date: 2026.08.04 18:41:26 +05'30'

(विजय शिंदे)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.सभापती ,महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय मुंबई

३. अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद /विधानसभा महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय मुंबई
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. सर्व सन्माननीय सदस्य विधान परिषद/ विधानसभा महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८. मा. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
९. मा. मुख्यमंत्री यांचे प्रमुख अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास व सांबावि-साऊ) यांचे सचिव मंत्रालय, मुंबई
११. मा. उपमुख्यमंत्री( राज्य उत्पादन शुल्क)यांचे सचिव मंत्रालय, मुंबई
१२. सर्व मा. मंत्री यांचे खासगी सचिव
१३. अपर मुख्य सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
१५. महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर,
१६. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई,
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१८. कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७/ व्यय-११/कोषा प्रशा-५/ ऋण व हमी/अर्थ-१८/प्रशा-४), मंत्रालय, मुंबई,
१९. निवड नस्ती.

सार्वजनिक बांधकाम विभाग

Rs.in crore

| Sr.No | Project Name | Sector | State | District | New/Ongoing | % Completion as on 01.04.2026 | Unpaid Bill (if any) as on 01.04.2026 (Rs. Cr) | Total Project Cost (Rs. Cr) | Project Capital Outlay for 2026-27 (Rs. Cr) | Special Assistance (Loan) Sought under the Scheme (Rs. Cr) | Special Assistance (Loan) Approved under the Scheme (Rs. Cr) | Project Start Date | Project End Date | Implementing Agency |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Improvement of Vijaydurg-Padel-Waghotan-Tarla Road SH-177 Km 0/00 to 32/400 Tal Kankavli & Devgad, Dist Sindhudurg | Roads | Maharashtra | Sindhudurg | Ongoing | 55.65 | 5.00 | 417.37 | 5.00 | 5.00 | 5.00 | 03-10-2024 | 03-10-2026 | Maharashtra PWD |
| 2 | Improvement of Pandharpur Degaon Chincholi Takali Sikandar Kurul to SH-202 Road MDR-66 Km 0/00 to 33/900 Tal-Pandharpur and Mohol Dist-Solapur | Roads | Maharashtra | Solapur | Ongoing | 44.02 | 45.00 | 271.20 | 45.00 | 45.00 | 45.00 | 15-10-2024 | 15-10-2026 | Maharashtra PWD |
| 3 | Improvement of MDR-43 Km. 0/0 to 65/650 (Part Malharpeth-Umbraj-Masur-Mayani-Dahigaon-Pandharpur Road) Satara District, Talukas Patan-Karad-Man, Dist-Satara | Roads | Maharashtra | Satara | Ongoing | 85.12 | 70.00 | 480.00 | 70.00 | 70.00 | 70.00 | 14-10-2024 | 14-10-2026 | Maharashtra PWD |
| 4 | Improvements to Kanhe Phata-Takve-Wadeshwar-Kusur-Khandi-Sawala Road MDR22 Km 1/00 to 40/00 Tal Maval, Dist. Pune | Roads | Maharashtra | Pune | Ongoing | 29.15 | 10.00 | 336.00 | 10.00 | 10.00 | 10.00 | 24-12-2024 | 24-12-2026 | Maharashtra PWD |
| 5 | Improvements to Katraj-Kondhwa-Chandi-Nangaon-Loni Road MDR 15 Km 34/500 to 41/700 Tal. Khed, Dist. Pune | Roads | Maharashtra | Pune | Ongoing | 45.64 | 20.00 | 241.60 | 20.00 | 20.00 | 20.00 | 15-10-2024 | 15-10-2026 | Maharashtra PWD |
| 6 | Improvements to Junnar-Hatvalbagh-Yedgaon-14 Number Road Km 44/00 to 62/00, MDR 1; Salwadi-Bor-Beha Road MDR 8 Km 0/00 to 4/500; and Bhorwadi-Nimagaon-Sava-Jambut Road MDR 9 Km 0/00 to 17/00, Tal Junnar, Dist. Pune | Roads | Maharashtra | Pune | Ongoing | 72.61 | 85.00 | 308.00 | 85.00 | 85.00 | 85.00 | 08-01-2025 | 08-01-2027 | Maharashtra PWD |
| 7 | Improvements to Shirur-Supa-Sangewadi Road SH-118 Km 66/00 to 98/00, Tal. Baramati, Dist. Pune | Roads | Maharashtra | Pune | Ongoing | 94.00 | 12.00 | 336.00 | 12.00 | 12.00 | 12.00 | 10-10-2024 | 10-10-2026 | Maharashtra PWD |
| 8 | Improvement of Dahanu-Kalvi-Jawhar Road SH-30 Km 0/00 to 25/300 (Fair Dahanu to NH-8), Taluka Vikramgad, Dahanu & Jawhar, Dist Palghar | Roads | Maharashtra | Palghar | Ongoing | 9.10 | 9.50 | 249.79 | 9.50 | 9.50 | 9.50 | 04-10-2024 | 04-10-2026 | Maharashtra PWD |
| 9 | Improvement of Nashik-Aurangabad-Vaijapur Road MSH-2, Km 179/00 to 205/00, Tal.Pachora, Dist.Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 72.30 | 150.00 | 560.00 | 150.00 | 150.00 | 150.00 | 14-10-2024 | 14-10-2026 | Maharashtra PWD |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | Improvement to Devalikheda-Phata-Supa-Sarola-Khadki Road SH 69 Km 0/00 to 48/00, Tal.Parner, Dist. Ahilyanagar | Roads | Maharashtra | Ahilyanagar | Ongoing | 61.89 | 35.00 | 362.40 | 35.00 | 35.00 | 35.00 | 11-10-2024 | 11-10-2026 | Maharashtra PWD |
| 11 | Improvements to Rasata-Shirdi Bypass Road SH 67C, Km 0/00 to 22/00, Tal Rahata, Dist Ahilyanagar | Roads | Maharashtra | Ahilyanagar | Ongoing | 26.02 | 50.00 | 165.00 | 50.00 | 50.00 | 50.00 | 24-06-2024 | 24-06-2026 | Maharashtra PWD |
| 12 | Improvement of Sekheda Phata-Dharangaon-Erandol-Neri-Jamner Road (SH-41) Km 0/000 to 24/700, part Dharangaon-Erandol-Jaigaon and Sangamner, Dist Ahilyanagar | Roads | Maharashtra | Ahilyanagar | Ongoing | 15.10 | 20.00 | 65.00 | 20.00 | 20.00 | 20.00 | 12-09-2025 | 11-06-2027 | Maharashtra PWD |
| 13 | A) Improvement to Chincholi-Vadgaon-Pingla-Vinchur-Daiwadi-Panchruti Road (Km 25/600 to 43/700), SH 37, Nashik B) Improvement to Sakurpata-Belgaon-Aurne to NH 3 Road SH 37 Km 43/700 to 67/700, Tal & Dist Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 11.00 | 7.08 | 207.95 | 7.08 | 7.08 | 7.08 | 26-09-2025 | 25-03-2027 | Maharashtra PWD |
| 14 | Improvement and Widening to Waghera-Ganeshgaon-Nezalwadi Road, km 6.69/1.36 to 10.5/2.76, Mahiwane to Dhudgaon, Tal & Dist Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 9.50 | 16.66 | 200.05 | 16.66 | 16.66 | 16.66 | 23-09-2025 | 22-03-2027 | Maharashtra PWD |
| 15 | A) Improvement to Trimbak-Devgaon-Shirghat-Khodala Road SH 34 km 10/200 to 18/500; and Shrirampur-Vaijapur Road SH-51 km 19/500 to 39/00; Khusral-Girnare-Waghera Road SH 26 km 10/00 to 27/700, Tal & Dist Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 4.00 | 5.00 | 47.02 | 5.00 | 5.00 | 5.00 | 22-09-2025 | 21-03-2027 | Maharashtra PWD |
| 16 | Construction of Concrete Road and paved shoulders (Pakhi Marg) on Dahanu-Jawhar-Trimbakeshwar-Nashik-Aurangabad Sikane Road SH 30 km 120/00 to 137/500, Tal Trimbakeshwar, Dist Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 10.00 | 86.61 | 350.00 | 86.61 | 86.61 | 86.61 | 25-09-2025 | 25-06-2027 | Maharashtra PWD |
| 17 | Improvements to Dagaon-Jorve-Dharangaon-Dhakambe-Amba-Sound-Jaulke Road SH 33 KM 104/00 to 137/500, Tal & Dist Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 7.00 | 40.74 | 163.05 | 40.74 | 40.74 | 40.74 | 26-09-2025 | 25-03-2027 | Maharashtra PWD |
| 18 | Improvements to Trimbakeshwar-Tupadevi-Ronle-Dhondegaon-Kosringaon-Umrale-Palkhed-Lonhandewadi-Jopul-Pimpalgaon Road NH-03, km 39/100 to 103/700, Tal Trimbakeshwar, Dist Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 12.00 | 53.72 | 215.00 | 53.72 | 53.72 | 53.72 | 17-11-2025 | 18-08-2027 | Maharashtra PWD |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 19 | Improvement and widening of Peth-Amboli-Ambet-Toi-Vir Road (SH-100) Km 1/00 to 30/00, Trimbakeshwar-Palnne-Deogaon-Ghod-Chalisgaon Road, Tal Dindori, Dist Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 23.00 | 51.22 | 205.00 | 51.22 | 51.22 | 51.22 | 22-09-2025 | 21-06-2027 | Maharashtra PWD |
| 20 | Widening and Improvements to Dagaon-Chotil Road SH 23 Km 102/00 to 184/400, Tal Trimbakeshwar, Dist Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 10.00 | 24.99 | 100.00 | 24.99 | 24.99 | 24.99 | 06-09-2025 | 25-03-2027 | Maharashtra PWD |
| 21 | Improvement and Widening to Vita-Lengere-Bhud-Walwan-Kharsundhi Road to District Border Road MDR 25, Km 39.3, Tal Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 12.00 | 39.30 | 157.30 | 39.30 | 39.30 | 39.30 | 25-09-2025 | 25-03-2027 | Maharashtra PWD |
| 22 | Improvement to Janai-Chatz International Airport to NH 60 4-Laning Road MDR 50 Km 13/00 to 14/00 and SH 37 Km 133/700 to 137/700, Tal Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 8.00 | 12.49 | 50.00 | 12.49 | 12.49 | 12.49 | 22-09-2025 | 21-03-2027 | Maharashtra PWD |
| 23 | Construction of Major Bridge on Nashik-Dindori-Vani Road MSH 03 at ch 35/200 on Umarda River, Tal Dindori, Dist Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 10.00 | 12.49 | 15.00 | 12.49 | 12.49 | 12.49 | 22-09-2025 | 21-03-2027 | Maharashtra PWD |
| 24 | A) Improvement of Bhavni Bu-Taked Road-Niwas-Pimpalgaon to Sakur Phata Road (MDR 22) km 0/00 to 7/400, Tal Igatpuri B) Improvement to SH 23-Adhurwadi-Taked Bu Road NH 24 km 0/0 to 6/500; Improvement to Bhandarawadi-Bhavthana Road | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 5.22 | 8.75 | 119.00 | 8.75 | 8.75 | 8.75 | 22-09-2025 | 21-03-2027 | Maharashtra PWD |
| 25 | Improvement & Widening to Satana-Ajmer-Saundane-Rawalgaon to Dagalphar Road MDR 28 ch 24/700 to 28/200; Improvement to Bhagur-Nashik Road MDR 34; Vanjarwadi Road MDR 21 | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 85.12 | 16.66 | 480.00 | 16.66 | 16.66 | 16.66 | 22-09-2025 | 21-03-2027 | Maharashtra PWD |
| 26 | Improvement to Nashik-Gangapur-Dugaon-Panchhuti-Bhagur-Davali-Yeda-Mukhne Road NH 3, Km 0/00 to 4/500, Tal & Dist Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 22.16 | 5.70 | 36.74 | 5.70 | 5.70 | 5.70 | 24-12-2024 | 24-12-2026 | Maharashtra PWD |
| 27 | Improvement and widening to Rajewadi-Beze-Taiwade-Pimplad-Shirasgaon ODR 124 Road MDR 197, Km 0/00 to 14/500, Tal Trimbakeshwar, Dist Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 12.00 | 12.49 | 50.00 | 12.49 | 12.49 | 12.49 | 26-09-2025 | 25-03-2027 | Maharashtra PWD |
| 28 | Construction of Bridge and Concrete Road of Beze Phata to Beze Road, Road VR-7, VR-5 and VR-8, Km 0/00 to 8/00, Tal Trimbakeshwar, Dist Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 60.50 | 6.26 | 25.00 | 6.26 | 6.26 | 6.26 | 22-09-2025 | 21-03-2027 | Maharashtra PWD |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 29 | Improvement to Mangrulpir-Darwha-Loni-Belora-Akolabazar-Aurangabad Road MSH-2, ch 200 to Km 44/40; Shivini Road NH-289 Bagwadi km 44/00 to 70/00, Tal Pachora, Dist Yavatmal | Roads | Maharashtra | Yavatmal | Ongoing | 57.12 | 20.00 | 146.19 | 20.00 | 20.00 | 20.00 | 10-10-2024 | 09-04-2027 | MSIDC |
| 30 | Improvement to Shendurjan-Sultanpur-Hirdav-Vadav Road SH 391, Km 0/00 to 36/00, Tal Mehkar, Dist Buldhana | Roads | Maharashtra | Buldhana | Ongoing | 60.65 | 28.00 | 200.01 | 28.00 | 28.00 | 28.00 | 09-10-2024 | 08-04-2027 | MSIDC |
| 31 | A) Improvement to Multipurpose Road to Dewhalkar-Kavad-Bhogaon Khurd MDR-19 Ch. Km 0/00 to 24/500, Part Akola-Murbad-Karashiwani-Mengaon-Kavad-Bhogaon Khurd MDR-19 | Roads | Maharashtra | Akola | Ongoing | 56.64 | 50.00 | 360.62 | 50.00 | 50.00 | 50.00 | 08-10-2024 | 08-04-2027 | MSIDC |
| 32 | Improvement to Malwada-Talisaman-Narayangaonwadi-Ekehra-Ambelohol MDR-32, Km 0/00 to 18/00, Tal Gangapur, Dist Chatrapati Sambhajinagar | Roads | Maharashtra | Chatrapati Sambhajinagar | Ongoing | 61.56 | 15.00 | 113.22 | 15.00 | 15.00 | 15.00 | 03-10-2024 | 02-04-2027 | MSIDC |
| 33 | Improvement to Aurangabad-Sillod-Jalgaon-Barhanpur Road MSH 05, four-laning CC road km 0/00 to 5/00 (Cutco Bus Stand to Harsul Tea Point), Tal & Dist Chatrapati Sambhajinagar | Roads | Maharashtra | Chatrapati Sambhajinagar | Ongoing | 58.77 | 11.00 | 92.34 | 11.00 | 11.00 | 11.00 | 07-10-2024 | 07-04-2027 | MSIDC |
| 34 | Improvement to Shivur-Bangala District Border (Nasgaon) SH-26 Km 182/500 to 184/500; Shrirampur-Vaijapur Road SH-51, Km 19/00 to 39/00, Tal & Dist Chatrapati Sambhajinagar | Roads | Maharashtra | Chatrapati Sambhajinagar | Ongoing | 45.27 | 33.00 | 251.34 | 33.00 | 33.00 | 33.00 | 09-10-2024 | 09-04-2027 | MSIDC |
| 35 | Improvement to Bagmandala-Ambet-Toi-Vir Road (SH-100) Km 0/00 to 30/00, Taluka Shrivardhan Mahad, Dist. Raigad | Roads | Maharashtra | Raigad | Ongoing | 65.21 | 10.00 | 148.68 | 10.00 | 10.00 | 10.00 | 09-12-2024 | 09-06-2027 | MSIDC |
| 36 | Improvement to Cement Concrete Road, 1) S.T. Depot to Amala; virar-shirsad-salwan-Ambedi-Padagha-Kalyan-Shil-Mohape SH-81 Km 21/050; 2) Khambala-Washind SH-82, Km 0/00 to 9/200, Tal Bhiwandi, Dist. Thane | Roads | Maharashtra | Thane | Ongoing | 58.34 | 27.00 | 415.42 | 27.00 | 27.00 | 27.00 | 04-10-2024 | 04-04-2027 | MSIDC |
| 37 | Improvement to Cement Concrete Road of Thane Rural (Panvel Road), Dist. Thane | Roads | Maharashtra | Thane | Ongoing | 56.55 | 8.00 | 114.93 | 8.00 | 8.00 | 8.00 | 04-10-2024 | 04-04-2027 | MSIDC |
| 38 | Construction of Cement Concrete Road from Nagpur Municipal Corporation limit, Dist. Nagpur | Roads | Maharashtra | Nagpur | Ongoing | 48.09 | 5.00 | 61.60 | 5.00 | 5.00 | 5.00 | 10-10-2024 | 10-04-2027 | MSIDC |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 39 | Improvement to Karanja-Waghoda-Jalalkheda Road SH 323, Km 40/00 to 50/384, Tal. Karanja, Dist. Wardha (actual total length 10.384 km) and Hinganghat-Bor Dam-Dhanoli-Kajali-Sonali to Wairal Residence for Dairy Station Road MDR 58, Km 23/00 to 45/00 | Roads | Maharashtra | Wardha | Ongoing | 46.07 | 21.00 | 171.35 | 21.00 | 21.00 | 21.00 | 09-10-2024 | 09-04-2027 | MSIDC |
| 40 | Improvement to Janala-Susi-Pombhurna-Chintalhaba-Vedkuli Road (SH 3891), Ch. 0/00 to 30/500, Dist Chandrapur | Roads | Maharashtra | Chandrapur | Ongoing | 43.31 | 25.00 | 198.59 | 25.00 | 25.00 | 25.00 | 12-09-2025 | 21-03-2027 | MRRDA |
| 41 | Improvement of two-lane with earthen shoulders for Rahati-Pimpalgaon(Kunta)-Waghi-Sayal-Nedri-Fasadgaon-Nandusa-Kamtha-Kondha-Bhogaon-Digras(Kh) MDR-10, MDR-25, Km 0/00 to 48/200, Tal. Nanded, Dist Nanded | Roads | Maharashtra | Nanded | Ongoing | 66.16 | 20.00 | 232.91 | 20.00 | 20.00 | 20.00 | 11-10-2024 | 11-04-2027 | MRRDA |
| 42 | Improvement to two-lane with Earthen Shoulder for Umari-Talegaon-Balegaon-Eaklinal-Kuntur-Nalgaon Road SH 264, Km 0/00 to 29/00, Tal. Umari, Dist Nanded | Roads | Maharashtra | Nanded | Ongoing | 64.94 | 12.00 | 142.97 | 12.00 | 12.00 | 12.00 | 21-09-2024 | 31-03-2027 | Maharashtra PWD |
| 43 | Improvement to two-lane with Earthen Shoulder for Loha-Gopal Tanda-Bharma-Bondhar & Prabhali to NH-161A MDR-107, Km 0/00 to 27/00, Tal-Nanded, Dist Nanded | Roads | Maharashtra | Nanded | Ongoing | 52.84 | 13.00 | 143.67 | 13.00 | 13.00 | 13.00 | 19-01-2024 | 31-03-2027 | MRRDA |
| 44 | Improvement & Widening to Satana-Ajmer-Saundane-Rawalgaon Road, Dist Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 50.88 | 7.00 | 255.01 | 7.00 | 7.00 | 7.00 | 11-10-2024 | 10-04-2027 | MSIDC |
| 45 | Improvement of Laxgaon-Vinchur Road SH No.7 (via Yerda-Igatpuri Taluka) Km 189/400 to 199/000, ODR 99, Km 14/100 Vinchur to Dongargaon-Bramhangaon-Khedlezhige, Godavari River, Talukas Patan-Karad, Dist Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 53.43 | 20.00 | 850.61 | 20.00 | 20.00 | 20.00 | 09-10-2024 | 09-04-2027 | MSIDC |
| 46 | Improvement and widening to Rajewadi-Beze-Taiwade-Pimplad Road, Dist Ahilyanagar | Roads | Maharashtra | Ahilyanagar | Ongoing | 48.35 | 7.00 | 254.71 | 7.00 | 7.00 | 7.00 | 09-10-2024 | 14-04-2027 | MSIDC |
| 47 | Improvement and widening of Vani-Dhodambe-Vazali Bhui Road SH-30 to 30/990, Tal Nashik | Roads | Maharashtra | Nashik | Ongoing | 47.11 | 7.00 | 298.01 | 7.00 | 7.00 | 7.00 | 15-10-2024 | 14-04-2027 | MSIDC |
| 48 | Improvement to Pachora-Darwha to Vaijapur-Aurangabad Road MSH-2, Dist Jalgaon | Roads | Maharashtra | Jalgaon | Ongoing | 69.39 | 7.00 | 116.69 | 7.00 | 7.00 | 7.00 | 20-08-2024 | 28-05-2027 | MSIDC |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 49 | Improvement of SH-13 to Nandane (MDR-52) Sawalmuni-Tambhare-Jakhane-Shevate-Wadi-Rewadi Road, Km 0/00 to 39/00, Dist Dhule | Roads | Maharashtra | Dhule | Ongoing | 72.30 | 9.00 | 151.88 | 9.00 | 9.00 | 9.00 | 30-09-2024 | 30-03-2027 | MSIDC |
| 50 | Widening and Improvement to Paldhi-Amalner-Padhri-Sarola-Khadki Road SH 67C, Km 121/200 to 158/500, Dist Nandurbar | Roads | Maharashtra | Nandurbar | Ongoing | 52.07 | 18.00 | 313.47 | 18.00 | 18.00 | 18.00 | 03-10-2024 | 02-04-2027 | MSIDC |
| 51 | Improvement of Sekheda Phata-Dharangaon-Erandol-Neri-Jamner Road (SH-41), Km 0/000 to 23/700, part Dharangaon-Erandol, Dist Jalgaon | Roads | Maharashtra | Jalgaon | Ongoing | 50.34 | 14.00 | 260.74 | 14.00 | 14.00 | 14.00 | 12-09-2025 | 02-04-2027 | MSIDC |
| 52 | Upgradation of Dondaicha-Kusumbe-Malegaon-Vita-Tasgaon-Sangli Road SH 60 (270/00 to 282/040), Tal Miraj, Dist. Sangli | Roads | Maharashtra | Sangli | Ongoing | 66.55 | 8.00 | 102.11 | 8.00 | 8.00 | 8.00 | 12-09-2025 | 13-03-2027 | MSIDC |
| 53 | Improvement to Akole-Kalas-Shelgaon Phata-Nimsakhar Road MDR 99, Km 3/700 to 24/00; Dahiwadi-Kalas Junction-Walchandnagar, Dist Pune | Roads | Maharashtra | Pune | Ongoing | 64.47 | 20.00 | 236.14 | 20.00 | 20.00 | 20.00 | 10-10-2024 | 09-04-2027 | MSIDC |
| 54 | Improvements with widening to Saswad-Supa-Undwadi-Shirsufal-Purandar-Bhigwan Road MDR 61, Km 0/00 to 84/400, Taluka Saswad and South Solapur, Dist Pune | Roads | Maharashtra | Pune | Ongoing | 61.93 | 36.00 | 430.40 | 36.00 | 36.00 | 36.00 | 07-10-2024 | 06-04-2027 | MSIDC |
| 55 | Improvement to Takali Road SH-211, Km 176/500 to 221/500 (PHIS Km 205/220), Dist Solapur | Roads | Maharashtra | Solapur | Ongoing | 56.29 | 21.00 | 259.55 | 21.00 | 21.00 | 21.00 | 10-10-2024 | 07-04-2027 | MSIDC |
| 56 | Improvements and Widening to Vita-Lengere-Bhud-Walwan-Kharsundhi-Banpuri-Talavade-Muidge to District Border Road MDR 25, Km 20, Dist Sangli | Roads | Maharashtra | Sangli | Ongoing | 53.42 | 25.00 | 305.25 | 25.00 | 25.00 | 25.00 | 14-10-2024 | 14-04-2027 | MSIDC |